गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



# भारती विद्यापीठाचे
## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद - भारती

**A Tri - Monthly News Letter**

Jul - Sept :2017




**संपादक मंडळ**

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

**सदस्य:**

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम्.एच्.पाटील



# निसर्ग जपताना...

**कार, टी.व्ही., मोबाईलप्रमाणे पृथ्वीचे नवे मॉडेल आणता येणार नाही.**

प्रसारमाध्यमांमध्ये काही गावांतील शेतकरी शेतीतून महिन्याभरात २० किंवा ४० लाखांचे उत्पन्न कसे मिळवतात व थोड्याच काळात बंगले बांधून आलिशान कार घेतात याचे रसभरीत वर्णन केले जाते.

मात्र हे कौतुकास्पद नाही.

हे शेतकरी नगदी पिकावर पैसा कमावतात.

त्या पिकाला म्हणजे उदा. डाळींबाला भाव देणारा ग्राहक औद्योगिक - शहरी असतो. तो पृथ्वीपातळीवर विनाश घडवणाऱ्या, कार्बन उत्सर्जन करणाऱ्या व पृथ्वीवरील हरितद्रव्य नष्ट करणाऱ्या प्रक्रियेतून हे पैसे मिळवतो. त्याला ही गावे पोसतात. विनाश करण्यासाठी बळ देतात.

जेव्हा अजनाळेसारखी गावे एव्हढे पैसे मिळवतात, तेव्हा तीदेखील औद्योगिक - शहरी व्यवस्थेचा भाग बनतात. सर्व जीवजातींना जगवणारे अन्न कसलाही मोबदला न घेता देणाऱ्या पृथ्वीला विनाशाकडे नेणारी जीवनविरोधी औद्योगिक उत्पादने, वस्तु उदा. मोटार इ. विकत घेतात.ही गावे 'पाणी' ही निसर्गाची विनाशुल्क उपलब्ध होणारी देणगी वापरतात. ती तळी राखण्याची बुध्दीमत्ता तर भारतीय गावांकडे हजारो वर्षे होती. परंतु त्यापुढील शाश्वत टिकणारे शहाणपण त्यांच्याजवळ होते. ते या मुंबई, न्यूयाॅर्कला आदर्श मानणाऱ्या गावांकडे नाही.

ते शहाणपण होते साधेपणाचे. यंत्राला नकार देणाऱ्या, चलनाचे प्रस्थ माजू न देणाऱ्या व म्हणूनच हजारो वर्षे चिरंतन अस्तित्व राखणाऱ्या, लोप न पावलेल्या भारतीय संस्कृतीचे ते शहाणपण या गावांकडे नाही.

इतिहासात प्रचंड पिरॅमिड बांधणारी इजिप्तची , काॅलोझियम बांधणारी रोम, अडीचशे फूट उंचीची बांधकामे करणारी अमेरिकेतील माया - इंका, तसेच कॅरिबिअन बेटांवरील शे- सव्वाशे फूट उंच पुतळे उभारणारी अशा सर्व संस्कृत्या सुमारे सहाशे ते बाराशे वर्षांत नामशेष झाल्या. तेव्हा यंत्र नसूनही हे घडले. *आता तर यंत्र आले आहे. त्यामुळे विनाशाला पृथ्वीव्यापी परिमाण मिळाले आहे. ते कार्बन व इतर उष्णता वाढवणाऱ्या द्रव्यांचे आहे. डोंगर जंगल नदी सागरातील हरितद्रव्य नष्ट होण्याचे आहे*. *मानवजात व जीवसृष्टीचे या शतकात पृथ्वीवरून उच्चाटन करणारी ही प्रक्रिया आहे.*

भारतीय संस्कृती फिरती व मिश्र पिके घेऊन शेतातच काड व इतर पालापाचोळा कुजवून मातीचा कस वाढता ठेवून शेती करत राहिली. तिने स्वयंचलित यंत्राचा मार्ग नाकारला.विकेंद्रीकरण करून चरखा व हातमागावर वस्त्र बनवले. पूर्ण पुन्हा चक्रीकरण होणाऱ्या माती व कुडाच्या घरात राहणे पसंत केले. म्हणून भारतीय संस्कृतीचा प्रवाह दहा हजार वर्षे वाहता राहिला.

गेली ५०- ६० वर्षे भारत आपले भारतीयत्व गमावून बसला आहे. तो पाश्चात्यांच्या औद्योगिकरणाचे व शहरीकरणाचे अनुकरण करत आहे. त्यातील एक चित्र शेतकऱ्यांना उत्पादनखर्च न भागल्याने आत्महत्या करण्याचे तर दुसरे शेतकऱ्यांनी आलिशान कार घेण्याचे आहे.

सर्वांनी तापमानवाढीचे भीषण संकट समजुन घेण्याची गरज आहे. उथळ प्रसारमाध्यमांनी खुप मोलाची वर्षे तापमानवाढीची चेष्टा करण्यात फुकट घालवली. रासायनिक शेतीची भलावण करून शेतकऱ्यांना व देशाला मृत्युपंथाला नेले. आता उलट फिरून शेतकऱ्यांना पुन्हा बहकावत आहेत.

आज आपल्याला जीवन देणाऱ्या पृथ्वीचे सरासरी तापमान दरवर्षी एक पंचमांश अंश सेल्सिअस या अभूतपूर्व गतीने वाढत आहे. फक्त येत्या चार वर्षात 'पॅरिस करार' अयशस्वी ठरत आहे. मानवजात वाचविण्यासाठी त्याने ठेवलेले सन १७५० च्या तुलनेत २°से ची वाढ रोखण्याचे उद्दीष्ट मोडले जाणार आहे. अशावेळी कार्बन उत्सर्जन करणारे , हरितद्रव्याचा नाश करणारे, डोंगर तोडणारे, नद्या - सागराना भ्रष्ट करणारे, कार, सीमेंट, स्टील अगदी वीजेसह यच्चयावत भौतिक वस्तुंचे उत्पादन तात्काळ थांबवायला हवे. न्यूयाॅर्क, लंडन, पॅरिस शांघाय, मुंबईची उपभोगवादी शहरी माणसे मोटार, टीव्ही, संगणक, मोबाईल इ.चे नवे माॅडेल वरचेवर घेत राहिली. जुने फेकत राहिली. *परंतु हे विसरली की तसे पृथ्वीचे *नाही. पृथ्वी एकमेव आहे. तिचे नवे माॅडेल आणता येणार नाही.

सर्व जगाने, यात शहरे ही आली, फक्त हवा, पाणी अन्नच सर्व जीवांना जगवते हे सत्य समजुन, ते देणारी पृथ्वीची क्षमता टिकवण्यासाठी ऊर्जाविरहित जीवनपध्दती स्वीकारली तरच आपण वाचण्याची शक्यता आहे.नैसर्गिक, सेंद्रीय, परंपरागत शेती, चरखा हातमागावर वस्त्र व कुडाची, मातीची घरे ही शाश्वत जीवनशैली हवी.

*जरा लहान बालकांच्या डोळ्यात पहा. त्यांना जगायचंय. त्यांना जीवन हवे आहे. ते त्यांच्यापासुन हिरावून घेऊ नका. म्हणून आपली जीवनविरोधी बंगला, कारकेंद्री जीवनशैली सोडा. साधेपणा घ्या. भरघोस पिके देणाऱ्या मातीचा तोच संदेश आहे.*

आजच्या अंकासोबत प्रवाह

पुण्य नगरी

www.epunyanagari.com

शुक्रवार, १५ सप्टेंबर २०१७

# साने गुरुजी पुरस्काराने प्राचार्य कणसे सन्मानित

सांगली / प्रतिनिधी

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांना साने गुरुजी प्रतिष्ठान व यशोदीप महिला विकास संस्थेच्या साने गुरुजी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सांगलीवाडीत झालेल्या सोहळ्यास विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर व ज्येष्ठ समीक्षक प्रा. वैजनाथ महाजन, डॉ. एस. आर. पाटील, नगरसेवक दिलीप पाटील, हरिदास पाटील, वसंत पाटील, विद्या पाटील, जयश्री कणसे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवाजी विद्यापीठ व भारती विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय समित्यावर डॉ. कणसे यांनी कार्य केले आहे. आतापर्यंत त्यांचे २५ हून अधिक संशोधन शोधनिबंध आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकेत प्रसिद्ध केले आहेत. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये ६५ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन सादरीकरणासाठी डॉ. कणसे यांनी लंडन, मलेशिया, सिंगापूर व दुबई येथे परदेश दौरे केले आहेत.



सांगली : प्राचार्य डी. जी. कणसे यांना सन्मानित करताना बी. एम. हिर्डेकर व प्रा. वैजनाथ महाजन.

दैनिक ललकार

दि.१६/७/२०१७ पान नं.१२



# मानवाचे निसर्गाशी असणारे अनमोल नाते जपूया

## सौ. विजयमाला कदम

सांगली दि. १५ - आधुनिकीकरण होत असताना पृथ्वीवर उपलब्ध असणारी वृक्षसंपदा संपत चालली आहे. निसर्गातील परिसंस्थेमध्ये मानवाने अतिरेकी हस्तक्षेप केल्यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात भौतिक सुख-सुविधांच्या हव्यासापोटी माणूस निसर्गापासून दुरावत चालला आहे. भावी पिढीच्या कल्याणासाठी निसर्गात उपलब्ध असणाऱ्या घटनाचा वारसा जोपासण्यासाठी सर्वजण कटिबद्ध आहोत. याकरिता मानवाचे निसर्गाशी असणारे अनमोल नाते जपले पाहिजे असे प्रतिपादन भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा सौ. विजयमाला कदम यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने आयोजीत ४ कोटी वृक्षलागवड मोहिमे अंतर्गत आयोजीत वृक्षारोपण समारंभामध्ये भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा सौ. विजयमाला कदम बोलत होते. यावेळी विभागीय मानद संचालक डॉ. एच.एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्राचार्या डॉ. सुरक्षणा कुलकर्णी, प्रा. एम. एच. पाटील, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. संतोष माने, उपस्थित होते. वृक्षारोपण करणे हे सोपे असते त्याहून अधिक महत्वाचे म्हणजे वृक्षाचे संवर्धन करणे हे होय. निसर्गामध्ये संतुलन राखून मानवाचे कल्याण होणेकरिता पर्यावरणपूरक कार्यक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे समाजामध्ये निसर्गाचे संवर्धनाविषयी जाणीवजागृती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांच्यासहीत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचे पुढे त्यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा सांगत असताना राबविलेल्या विविध नाविन्यपूर्ण माहिती यावेळी सांगितली. यावेळी उपस्थित मान्यवरांचा प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या हस्ते ग्रंथ, शाल व गुलाबाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. या समारंभानंतर विभागीय मानद संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, उपस्थित विद्यार्थी, स्वयंसेवक यांच्याहस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात जांभूळ, पिंपळ, वड, करंज, कडूनिंब, सिसम आदी वेगवेगळ्या वनस्पतीचे वृक्षारोपण करणेत आले. यावेळी डॉ. विकास आवळे, प्रा. प्रभा पाटील, प्रा. श्रीकृष्ण मोहिते यांचे सहित महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढारी सांगली, सोमवार १८ सप्टेंबर २०१७




सांगलीवाडीच्या पतंगराव कदम महाविद्यालयाने सादर केलेल्या एकांकिकेला द्वितीय क्रमांक मिळाला.

पुण्य नगरी
गुरूवार, २१ सप्टेंबर २०१७

## कदम महाविद्यालयाचे जलतरणमध्ये यश

सांगली / प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा संकुलात सांगली विभागीय जलतरण क्रीडा स्पर्धा झाली. ४ सप्टेंबर रोजी इस्लामपूर येथे झालेल्या सांगली विभागीय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत डॉ. कदम महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळविले. यशस्वी खेळाडू पुढीलप्रमाणे - जलतरण- मनीष केवट- ५० मी. ब्रेस स्ट्रोक, ५० मी. बॅक स्ट्रोक - द्वितीय क्रमांक, १०० मी. फ्री स्टाईल -तृतीय. शुभम भिसे- ५६-६० किलो वजनगट प्रथम, नेहा गळंगे -५२-५६ किलो वजनगट द्वितीय, पुजा कोष्टी ४६-५२ किलो वजन गट तृतीय. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक, कुलपती डॉ. पतंगराव कदम, प्र. कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, अध्यक्षा विजयमाला कदम यांनी कौतुक केले.

दैनिक ललकार
दि.२४/९/२०१७ पान नं.१२

## 'नदी वाचवा' अभियानातर्गंत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात जलप्रतिज्ञा

सांगली दि. २३ - महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून मिळालेल्या सूचनेनुसार नदी वाचवा अभियानातर्गंत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी जल प्रतिज्ञा घेऊन 'पाणी वाचवा देश वाचवा' हा संदेश घरोघरी पोहचवण्याचा संकल्प केला. नद्या या आपल्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. मात्र आज नद्यांजी परिस्थिती अतिशय वाईट बनलेली आहे. बारमाही वाहणाऱ्या नद्या मृत होण्याच्या मार्गावर आहेत. भरमसाठ प्रमाणात होणारी वृक्षतोड हेच यामागचे मुख्य कारण आहे. झाडे नसल्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणात धुप होत आहे. त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल ही ढासळत चाललेला आहे. या महत्वाच्या समस्येकडे सर्वांनीच गांभीर्याने पाहायाची गरज आहे. त्यासाठी नदी वाचवा अभियान ही संकल्पना उपयोगी ठरणार आहे.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पाण्याचा अपव्यय टाळण्याचे व पाणी वाचवण्याचे आवाहन केले. याप्रसंगी ज्युनिअर विभाग प्रमुख प्रा. श्रीकृष्ण मोहिते व राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. खडके, बी. पी., प्रा. माने डी.टी., प्रा. सौ. पाटील व्ही.आर., प्रा. कु. तांबडे एस.एस. व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
www.janpravas.in
पो.र.नं.SGL/25/2016-18 RNI NO. MAHMAR/2003/11365 सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०१७ वर्ष-१२ अंक-

## राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदी आवश्यक : प्राचार्य डॉ. कणसे

सांगली ■ प्रतिनिधी

२०२० साली भारत देश महासत्ता होणार आहे. मात्र त्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे. ही राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी हिंदी या राष्ट्रभाषेची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले. ते डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्यावतीने आयोजित हिंदी दिनाच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या आरंभी भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या मातोश्री श्रीमती बयाबाई कदम यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. आईच्या संस्काराची महतीही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितली. 'भारती वाणी' या भित्तीपत्रिकेचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी याप्रसंगी अनावरण केले. हिंदी विषयाच्या अध्यापिका सौ. शोभा पाटील यांनी हिंदी दिनाचे महत्व विषद केले. राष्ट्रभाषेचा भविष्यकाळ उज्वल असल्याने विद्यार्थ्यांनी हिंदीचे अध्यापन करावे असे सांगितले. यावेळी प्रा. एम. एच. पाटील, ज्युनिअर विभागप्रमुख प्रा. श्रीकृष्ण मोहिते, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. बी. पी. खडके, प्रा. एस. एस. तांबडे, सौ. व्ही. आर. पाटील, सर्व शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. बी. डी. पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता पवार हिने केले तर आभार प्रा. डी. टी. माने यांनी मानले.

दैनिक ललकार
दि.२७/७/२०१७ पान नं.१२



## राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी मतदार नोंदणी अभियानात सहभागी व्हावे

### प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे

सांगली दि. २६ - भारतीय लोकशाही संपूर्ण जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. संविधानाने भारतातील १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांना मतदानाचा अनमोल अधिकार दिला आहे. महाविद्यालयीन स्तरापासून युवकवर्गामध्ये निर्णय प्रक्रिया विकसित होत असते. सामर्थ्यवान लोकशाहीसाठी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. राष्ट्राच्या विकासाकरिता लोकशाही मतदान प्रक्रियेत युवकांचा सक्रिय सहभाग असावा. राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करणेसाठी मतदान नोंदणी अभियानात युवकांनी सहभागी झाले पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात जिल्हा मतदार नोंदणी अभियानातर्गत कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. त्यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे बोलत होते. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी फॉर्म नंबर ६ चे वाटप करण्यात आले. दानाला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व आहे म्हणून राष्ट्राच्या विकासाकरिता काही तरी दान करावयाचे असेल तर ते म्हणजे मतदान होय. याकरिता शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करुन मतदार नोंदणी अभियानात सहभागी होणेसाठी प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांनी आपआपल्या परिसरातील नागरिकांना ३१ जुलै पूर्वी मतदार नोंदणी करुन राष्ट्रीय कर्तव्यासाठी उत्सुक करावे असे आवाहन यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले. यावेळी बी. एल. ओ. २७७, २७८, २८० चे अधिकारी श्री. व्ही. एस. शिंदे, श्री. ए. ए. शेख, सौ. शैलजा संजय पाटील, सौ. शबाना मुश्रीफ यांचेसहीत प्रा. एम. एच. पाटील, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. संतोष माने, प्रा. श्रीकृष्ण मोहिते आदी प्राध्यापक उपस्थित होते.

ांगली, मंगळवार, २९ ऑगस्ट २०१७ । किंमत ₹ चार * आजचा अंक : पाने १६ (१२+४)

सकाळ

# नागरी सुरक्षा दलात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

## डॉ. दीपाली काळे : पतंगराव कदम महाविद्यालयात मार्गदर्शन

सांगली, ता. २८ : विद्यार्थ्यांनी शांतता, बंधुता, सामाजिक भान ठेवून वागावे. देशासाठी काही चांगले करण्याची इच्छा असेल, तर नागरी सुरक्षा दल चांगली संधी आहे. उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन पोलिस मित्र म्हणून काम करावे, असे आवाहन शहर पोलिस उपाधीक्षक डॉ. दीपाली काळे यांनी केले. पतंगराव कदम महाविद्यालयात गणेशोत्सव २०१७ अंतर्गत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. शहर पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे उपस्थित होते. श्री. शेळके म्हणाले, "पोलिस सेवेत येण्यासाठी प्रयत्नशील राहावे."




सांगली : पतंगराव कदम महाविद्यालयात गणेशोत्सव २०१७ कार्यक्रमात बोलताना उपाधीक्षक डॉ. दीपाली काळे. व्यासपीठावर निरीक्षक रवींद्र शेळके, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आणि इतर.

प्राचार्य डॉ. कणसे यांनी सामाजिक उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन गायकवाड यांनी संयोजन केले. प्रा. भारती भावीकट्टी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. पी. खडके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. डी. पाटील, प्रा. उज्ज्वला देसाई, प्रदीप डिकुळे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.